जा.क्र. 5165/2017
धर्मादाय आयुक्त कार्यालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई,
दिनांक ०३.१०.२०१७.

# सुधारित परिपत्रक क्रमांक ५१५ /२०१७ दिनांक ०३.१०.२०१७

१. या परिपत्रकाद्वारे धर्मादाय संघटनेतील सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त व धर्मादाय उप आयुक्त (सहाय्यक संस्था निबंधक) यांना सुचित करण्यात येते कीं, संस्था नोंदणी कायदा, १८६० अन्वये संस्था नोंदणी दाखल प्रस्तावामध्ये, जर सर्व कागदपत्रे परिपूर्ण असतील तर त्याच दिवशी संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे. प्रस्ताव दाखल करुन घेतांना, आवश्यक ती माहिती देवून, पूर्ण असा प्रस्ताव दाखल करुन घ्यावा व त्यांना त्याच दिवशी संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे.

२. संस्था नोंदणी कशी करावी या बाबत आवश्यक ती माहिती धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर टाकलेली आहे. त्यामुळे, संस्था नोंदणीसाठी येणारी ऑनलाईन प्रकरणे, त्याच दिवशी तपासून, त्यांना ऑनलाईन संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत, त्यांना तीन दिवसांत संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे.

३. सर्व अधिका-यांना असे सुचित करण्यात येते कीं, विनाकारण संस्थेच्या सर्व पदाधिका-यांना कार्यालयात बोलवू नये. त्यांच्या वतीने, त्यांचे प्रतिनिधी म्हणून वकील किंवा अन्य कोणी एक व्यक्ती आले तर ते ग्राहय मानण्यात यावे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत संस्था नोंदणी प्रकरणे प्रलंबीत ठेवू नयेत आणि एका दिवसात त्यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. सदरहू परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे व धर्मादाय सहआयुक्त यांनी या बाबत आपला अहवाल सादर करावा.

(शि. ग. डिगे) 3.10.17
धर्मादाय आयुक्त/संस्था निबंधक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत--

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सहआयुक्त
३. सर्व धर्मादाय उपआयुक्त
४. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त

D:\mbsarnobat\Administrative orders-circulars\October, 2017.docx

जा.क्र. 5165/2017
धर्मादाय आयुक्त कार्यालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई,
दिनांक ०३.१०.२०१७.

03 OCT 2017

## परिपत्रक क्रमांक ५१५/२०१७ दिनांक ०३.१०.२०१७

१. या परिपत्रकाद्वारे धर्मादाय संघटनेतील सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त व धर्मादाय उप आयुक्त (सहाय्यक संस्था निबंधक) यांना सुचित करण्यात येते कीं, संस्था नोंदणी कायदा, १८६० अन्वये संस्था नोंदणी दाखल प्रस्तावामध्ये, जर सर्व कागदपत्रे परिपूर्ण असतील तर त्याच दिवशी संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे. प्रस्ताव दाखल करुन घेतांना, आवश्यक ती माहिती देवून, पूर्ण असा प्रस्ताव दाखल करुन घ्यावा व त्यांना त्याच दिवशी संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे.

२. संस्था नोंदणी कशी करावी या बाबत आवश्यक ती माहिती धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर टाकलेली आहे. त्यामुळे, संस्था नोंदणीसाठी येणारी ऑनलाईन प्रकरणे, त्याच दिवशी तपासून, त्यांना ऑनलाईन संस्था नोंदणी प्रमाणपत्र दयावे.

३. सर्व अधिका-यांना असे सुचित करण्यात येते कीं, विनाकारण संस्थेच्या सर्व पदाधिका-यांना कार्यालयात बोलवू नये. त्यांच्या वतीने, त्यांचे प्रतिनिधी म्हणून वकील किंवा अन्य कोणी एक व्यक्ती आले तर ते ग्राहय मानण्यात यावे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत संस्था नोंदणी प्रकरणे प्रलंबीत ठेवू नयेत आणि एकच दिवसात त्यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. सदरहू परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे व धर्मादाय सह आयुक्त यांनी या बाबत आपला अहवाल सादर करावा.

3.10.17

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त/संस्था निबंधक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत--

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त

D:\mbsarnobat\Administrative orders-circulars\October, 2017.docx